**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३७८/२०२२ मधील निशाणी ६३ वरील आदेश</u>**

**<u>(वासंती शेळके विरुध्द दिलीप शेळके)</u>**

**<u>CNR No.MHSN050019602022</u>**

प्रतिवादींनी प्रस्तुत अर्ज प्रस्तुत दावा व विशेष दिवाणी दावा क्र. ३६/२०२३ एकत्र चालविणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींचे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की, प्रस्तुत दावा गहाणखत दस्तानुसार वाद मिळकतीचे पुन्हा खरेदीखत करुन मिळणेबाबत व विशेष दिवाणी दावा क्र. ३६/२०२३ विनिर्दीष्ट कराराचे पालन करुन खरेदीखत करुन देण्याबाबत दाखल केलेला आहे. दोन्ही दाव्यातील पक्षकार व वाद मिळकत एकच असून प्रकरण लवकर निकाली काढण्याकरिता दोन्ही प्रकरणांमधील पुरावा एकत्र नोंदविणे आवश्यक आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. याउलट वादीचे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की, दोन्ही दाव्यातील अनुतोष वेगवेगळा असून वेगवेगळे मुद्दे काढण्यात आले आहेत. अशा परिस्थितीमध्ये एकत्र पुरावा घेणे न्यायोचित ठरणार नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता विशेष दिवाणी दावा क्र. ३६/२०२३ मध्ये वादीने दिनांक १३/१०/२०१६ च्या तोंडी कराराची पुर्तता करुन खरेदीखत करुन मिळणेबाबत अनुतोष मागितल्याचे दिसते. सदर दाव्यातील कथनाचे काटेकोरपणे अवलोकन केले असता प्रतिवादींनी दिनांक २१/०४/२०१५ रोजी नोंदणीकृत गहाणखत दस्त क्रमांक १३८६/२०१५ करुन दिल्याचे दिसते. नियमित दिवाणी दावा क्र. ३७८/२०२२ मधील कथनाचे अवलोकन केले असता दिनांक २१/०४/२०१५ च्या गहाणखतासंदर्भात वादीने कथन करुन ठरल्याप्रमाणे परत खरेदी–खत करुन मिळणेबाबत अनुतोष मागितल्याचे दिसते. दोन्ही दाव्यातील पक्षकार व वाद मिळकत एकच असल्याबाबत दुमत नाही. याशिवाय, दोन्ही दाव्यामध्ये दिनांक २१/०४/२०१५ च्या गहाणखता भोवती उभय पक्षांत वाद असून त्या अनुषंगाने उभय पक्षाने आपआपल्या प्रकरणामध्ये अनुतोष मागितल्याचे दिसते. सदर बाब लक्षात घेता

दोन्ही प्रकरणं एकत्र चालविल्यास व दोन्ही प्रकरणातील होणारा पुरावा एकाच प्रकरणात नोंदविल्यास उभय पक्षास पुर्वग्रहदुषित ठरण्याचा प्रश्न उद्भवत नाही. याउलट जवळपास एक सारखाच साक्षीपुरावा येण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे प्रत्येक प्रकरणासाठी वेळ वाया जाणार आहे. परिणामी, प्रकरण निकाली काढण्याकरिता विलंब होणार हे निश्चित. अशा परिस्थितीमध्ये दोन्ही प्रकरणं एकत्र चालवून त्यामध्ये आलेला पुरावा एकाच प्रकरणात नोंदविणे न्यायोचित होईल, असे माझे स्पष्ट मत आहे. प्राप्त परिस्थिती, दाव्याचे स्वरुप व पक्षकारांनी मागितलेला अनुतोष लक्षात घेता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, अर्ज मंजूर करण्यायोग्य आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. नियमित दिवाणी दावा क्र. ३७८/२०२२ व विशेष दिवाणी दावा क्र. ३६/३०२३ ची सुनावणी एकत्र चालविण्यात येते.

३. दोन्ही प्रकरणातील पुरावा विशेष दिवाणी दावा क्र. ३६/२०२३ मध्ये नोंदविण्यात यावा.

४. विशेष दिवाणी दावा क्र. ३६/२०२३ मध्ये नोंदविलेला पुरावा नियमित दिवाणी दावा क्र. ३७८/२०२२ मधील पुरावा समजण्यात यावा.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN

Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.02.25 17:19:15 +0530

**इस्लामपूर.** **(भगवान म. कारलेकर)**

**दिनांकः– २४/०२/२०२६.** **सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.**